## नियमीत दिवाणी मुकदमा क्र. ६१/२०२४ मधील नि. २० वरील आदेश

संदिप मधुकर साळसकर

विरुध्द

मंदाकिनी यशवंत चौधरी

प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ अन्वये दाव्यास योग्य कारण नमूद न केल्याने वादीचा दावा काढून टाकणेत यावा याकरीता दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादीचे अर्जातील कथन असे की, गाव मौजे वालावल, ता. कुडाळ येथे जमिन मिळकतीचा तपशील असा की,

| अ.नं. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| १. | ३१अ | ३२ | ०–०१–५० | ०–०५ |
| २. | ३१अ | ३३ | ०–०२–८० | ०–२७ |

वर नमूद केलेल्या सर्व्हे वर्णनाच्या मिळकतीमधून येणारा वाहत असलेला पाण्याचा ओहळाचा सहा फुट रुंदीचा मुळ मार्ग नष्ट करुन त्याठिकाणी पाण्यासाठी केवळ १ फुट रुंदीचा मार्ग ठेवून तेथे बांधकामासाठी खोदकाम चालू केले आहे. सदरचे बांधकाम केल्याने वादीच्या इमल्यास धोका होणार आहे. त्याकारणाने प्रतिवादीने सुरु केलेले बांधकाम थांबविण्यात यावे. असा दावा वादीने आणला आहे. वादीने सदर अर्जासोबत दाखल केलेल्या दावा मिळकतीचे छायाचित्रामध्ये कुठेही पाण्याचा सहा फुट असलेला ओहोळ दिसून येत नाही. त्याचप्रमाणे प्रतिवादी याने वादी याच्या घराशेजारुन येणा–या पाण्याच्या मार्गाचे छायाचित्र हजर केलेले आहेत. सदर छायाचित्रांमध्ये सुध्दा कोठेही पिढयानपिढया वाहत येणा–या सहा फुट रुंदीचा ओहोळ दिसून येत नाही. तसेच वादी याने आपल्या दाव्यासोबत सादर केलेल्या छायाचित्रामध्ये सुध्दा सहा फुट रुंदीचा नैसर्गिक पाण्याचा ओहोळ दिसून येत नाही. त्यामुळे सदर ओहोळचा मुळ मार्ग नष्ट करण्याचा प्रश्न येत नाही. त्यामुळे प्रतिवादीचा सदर अर्ज मंजुर करणेत यावा व वादीने या दाव्यास योग्य कारण नमूद न केल्याने सदरचा दावा आदेश ७ नियम ११ अन्वये काढून टाकणेत यावा अशी विनंती केली आहे.

**०३.** वादीने निशाण २५ वर आपले म्हणणे देऊन अर्जास विरोध दर्शविला आहे. वादीचे कथन असे की, दावा जमिनी व प्रतिवादीची जमीन मिळकतींमधून पिढयानपिढया डोंगरातून वाहत येणारा एक सहा फुट रुंदीचा पाण्याचा ओहोळ आहे. सदर पाण्याचा प्रवाह डोंगरातून दक्षिणेकडून सर्व्हे नं. ३१अ हिस्सा नं. ३३ या दावा जमिनीमधून वाहत जात कर्ली नदीस मिळतो. मागिल अनेक वर्षापासून सदर डोंगरातून येणारे पाणी त्याच दिशेने वाहत आहे व पाण्याचा नैसर्गिक प्रवाहास आजपर्यंत कोणीही बाधा आणलेली नाही. परंतु प्रतिवादी सदरचा प्रवाह नष्ट करुन त्याठिकाणी घराचे बांधकाम करत असल्याने डोंगरातून येणारे पाणी वादीच्या जमिनीमध्ये साठून वादीचे पैशाचे स्वरुपात कधीही भरुन न येणार असे अपरिमित नुकसान होणारे आहे. उपरोक्त बाबी दाव्याच्या चौकशी अंती लेखी व तोंडी पुरावा दिल्यानंतर सिध्द होणारे आहे. त्यामुळे सदरच्या बाबी विचारात न घेता या टप्प्यावर दावा काढून टाकण्यात आल्यास वादीच्या कायदेशीर हक्कावर बाधा येणारी आहे. प्रस्तुतचा अर्ज कायदेशीर तरतुदींच्या विरोधात असल्याने तो फेटाळला जाण्यास पात्र आहे. सबब, अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली आहे.

**०४.** प्रतिवादी व वादी यांचा अर्ज व म्हणण्यातील वादकथनांचे अवलोकन केले असता खालीलप्रमाणे वादप्रश्न उपस्थित होतात व त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवत आहे.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रस्तुत दाव्याला दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ अन्वये बाधा येते असे प्रतिवादी शाबीत करते काय ? | नाही. |
| २. | आदेश व हुकुमनामा काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

**०५.** अर्ज व म्हणणे, अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीतर्फे जे.एच.पावसकर व प्रतिवादी तर्फे श्री. एस.एस. कुलकर्णी यांचा युक्तीवाद ऐकला.

<u>वादप्रश्न क्र. १ व २ करीता –</u>

०६. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ अन्वये पुढील कारणासाठी वादपत्र नाकारता येते .

अ. जेव्हा त्यातून काही वादकारण दिसून येत नसेल,

ब. जो अनुतोष मागितला असेल त्याचे मुल्य कमी दाखविले असेल व न्यायालयाने मुल्यांकनात सुधारणा करण्यास सांगून त्यामध्ये कसुर केली असेल,

क. वादपत्र अपु–या मुल्यांचा मुद्रांक लावलेल्या कागदावर लिहीलेले असेल व न्यायालयाने आवश्यक तो मुद्रांकित कागद सादर करण्यास सांगितले असूनही वादीने कसुर केली असेल,

ड. दाव्याला एखाद्या कायद्यानुसार रोध आहे असे दिसत असेल,

इ. वादपत्र दोन प्रतीत सादर केले नसेल,

ई. वादीने नियम ९ चे तरतुदीचे पालन केले नसेल,

उपरोक्त नमूद कारणांकरीता वादपत्र नाकारता येऊ शकते. वादीने दाव्यातील केलेली कथने व त्यांचे विनंतीचे अवलोकन केले असता, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुध्द कायम व अज्ञार्थी ताकिदीकरीता दाखल केलेला आहे.

०७. प्रतिवादीच्या अर्जातील कथनांनुसार, वादीने प्रस्तुत दाव्यामध्ये दाव्यास घडलेले कारण नमूद केलेले दिसून येत नाही. त्यामुळे प्रस्तुतचा दावा हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ अन्वये काढून टाकण्यात यावा. प्रतिवादीने दाखल केलेल्या वादपत्रामध्ये केलेल्या कथनांचे अवलोकन केले असता, वादीने परिच्छेद १० मध्ये दाव्यास घडलेले कारण स्पष्टपणे नमूद केले आहे. प्रस्तुत दाव्यास घडलेले कारण हे चुकीचे आहे किंवा योग्य आहे ही बाब उभय पक्षकारांनी दिलेल्या तोंडी व लेखी पुराव्याअंती ठरणारी बाब आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११अ मध्ये " जेव्हा दाव्यातील वादकथनामधून काही वादकारण दिसून येत नसेल त्यावेळी वादपत्र नाकारता येते" अशी तरतुद नमूद आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये वादीने परिच्छेद १० मध्ये वादकारण नमूद केलेले दिसून येते. त्यामुळे प्रतिवादीने नमूद केलेली उपरोक्त कारण हे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११अ मध्ये दिलेल्या तरतुदीनुसार वादपत्र

नाकारण्यायोग्य नाही. सबब, सदरील कारणाकरीता प्रस्तुत दाव्याचे वादपत्र नाकारता येणार नाही.

०८. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या Kuldeep Singh Pathania Vs. Bikram Singh Jaryal, AIR 2015 Supreme Court 593 या केसमध्ये दिलेल्या न्यायनिर्णयामध्ये नोंदविलेली निरीक्षणे प्रस्तसुत अर्ज न्यायनिर्णीत करताना मार्गदर्शक ठरणारी आहेत. त्यामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने Mayer (H.K.) Ltd. and other V. Owners & Parties, Vessle M.V. Fortune Express and Ors. या केसमध्ये समान मुद्दा न्यायनिर्णीत करताना पुढील निरीक्षणे नोंदविली. "*From the aforesaid it is apparent that plaint cannot be rejected on the basis of the allegations made by the defendant in his written statement or in an application for rejection of plaint. The Court has to read the entire plaint as whole to find out whether it discloses a cause of action and if it does, then the plaint cannot be rejected by the Court exercising the powers under order 7 Rule 11 of Code.*" उपरोक्त केस मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दाव्यातील कारण लक्षात घेता संपुर्ण दाव्यातील कथने विचारात घेणे आवश्यक आहे असे नमूद केले. प्रस्तुत केसमध्ये वादीने परिच्छेद १० मध्ये दाव्याचे कारण नमूद केले आहे. त्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाने नोंदविलेली निरीक्षणे प्रस्तुत केसला लागु पडतील. त्यामुळे प्रस्तुत दाव्यास दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ ची बाधा येणारी नाही. माझे उपरोक्त विवेचनानुसार, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ मधील तरतुदीचे अवलोकन केले असता प्रस्तुतचा अर्ज त्यामधील तरतुदींशी सुसंगत नसल्याने अर्ज मंजुर होण्यास पात्र नाही. सबब, वादप्रश्न क्र. १ चे उत्तर **नकारार्थी** देत आहे. वादप्रश्न क्र. २ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात येतो.

Digitally signed by PAWAN RAMBHAU DHORE
Date: 2025.02.15 16:46:21 +0530

दिनांक– १३/०२/२०२५

(प.रा.ढोरे )
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, कुडाळ.